**MHKO100006502022**

## <u>रे.क.नं. १६९/२०२२ मधील निशाणी क्र. २३५ वरील आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज दिनांक ११-०२-१९८८ च्या हमीपत्राच्या छायांकित प्रतीस निशाणी देवून पुराव्यात वाचण्यात यावे याकरीता दाखल केला आहे.

**२.** त्यांनी असे कथन केले आहे की, सदर हमीपत्रातील हस्ताक्षर ओळखण्यासाठी सुभाना रेडेकर यांचा मुलगा सतिशची साक्ष त्यांनी नोंदविली आहे. त्यांनी हमीपत्रातील अक्षर त्याच्या वडीलांचे असलेचे व त्यावरील सही त्यांच्या वडीलांची असलेचे ओळखले आहे. यापूर्वी साक्षीदार विष्णू आप्पा निलवे यांनीही हमीपत्रावर त्यांची सही असल्याचे कथन केले आहे. सदर दस्त हा दुय्यम पुरावा आहे. तरी, हमीपत्राच्या छायांकित प्रतीस निशाणी देवून पुराव्यात वाचण्यात यावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास निशाणी २३६ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, साक्षीदार विष्णू निलवे यांच्या पुराव्यासमयी हमीपत्र हे छायांकित असून ते पुराव्यामध्ये वाचता येणार नाही अशी नोंद घेण्यात आली होती. त्यामुळे पुन्हा त्या साक्षीचा आधार घेवून प्रस्तूत अर्ज दाखल करता येणार नाही.

**४.** पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, मा. उच्च न्यायालय, सर्किट बेंच कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार वादी यांना दुय्यम पुरावा अथवा हमीपत्र दस्त शोधण्याची मुभा देण्यात आली होती. परंतू वादी यांनी त्याप्रमाणे कोणतीही कृती केली नाही. साक्षीदार विष्णू निलवे किंवा सतिश रेडेकर यांच्या पुराव्याव्दारे हमीपत्र पुराव्यामध्ये वाचता येणार नाही अथवा

त्याला निशाणी देता येणार नाही. मे. उच्च न्यायालय यांनी वादी यांना संधी देवून देखील वादी यांनी त्यांच्या कृती मधून त्यांना दुय्यम पुरावा करण्याचा नाही अथवा त्यांनी तो जाणिवपुर्वक सोडून दिला असल्याचे दिसून येते.

**५.** त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, मे. उच्च न्यायालय यांच्या आदेशाप्रमाणे वादी यांनी कोणतीही कृती जाणिवपुर्वक न केलेने वादी यांना आता त्यांच्या स्वतःच्या चुकीच्या कृतीमुळे यापुढे कोणताही पुरावा करता येणार नाही व त्यांचा पुरावा बंद करण्याचा आदेश करून पुढील चौकशी व्हावी. तरी, वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

**६.** वादी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी फेर पुरावा करण्यासाठी सतिश रेडेकर यांची साक्ष नोंदविली आहे. हमीपत्रात नमुद केल्याप्रमाणे तो दस्त बाबुराव यांच्या ताब्यात आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ६७ प्रमाणे त्या दस्तातील हस्ताक्षर व सही सुभाना रेडेकर यांचे असल्याचे सतिश रेडेकर यांनी साक्षी दरम्यान कथन केले आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ६५ प्रमाणे त्यांनी पुरावा दिला आहे, त्यामुळे तो दस्त निशाणी देवून पुराव्यात वाचण्यात यावा.

**७.** प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वादीस दुय्यम पुरावा देण्यास परवानगी देण्यात आली होती. वादीने दुय्यम पुरावा देण्यास परवानगी न मागता फेर पुरावा करण्यास परवानगी मागितली आहे. वादीने दाव्यात हमीपत्र प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे कथन केले नाही. तसे कथन नसल्याने त्याबाबत वादीस पुरावा करता येणार नाही. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वादीने कोणतीही कृती केली नाही. त्यामुळे वादीने केलेल्या सतिश रेडेकर व विष्णू निलवे यांच्या पुराव्यानुसार हमीपत्र पुराव्यात वाचता येणार नाही म्हणून अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ त्यांनी *थारामल पिथंबरं वि. टी.उषा कृष्णन २०२६ डीजीएलएस (एससी) १४२* या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दुय्यम पुरावा स्विकारण्यापूर्वी कोणत्या प्रक्रियेचा अवलंब केला पाहिजे हे परिच्छेद क्र.२०.१ ते २०.७ मध्ये नमुद केले आहे. दुय्यम पुरावा स्विकारण्यापूर्वी पक्षकाराने

मुळ दस्त अस्तित्वात होता व तो झाला होता, तसेच तो मुळ दस्त कोणत्या कारणामुळे पक्षकार न्यायालयात दाखल करू शकत नाही हे स्थापित करणे गरजेचे आहे. त्याशिवाय छायांकित प्रत पुरावा होवू शकत नाही.

**८.** अर्ज, म्हणणे, दोन्ही बाजूचा युक्तीवाद व मा.उच्च न्यायालय, मुंबई सर्किट बेंच, कोल्हापूर यांचा आदेश तसेच निशाणी २२६ वरील वादीने दाखल केलेला अर्ज व त्यावरील आदेश या सर्वांचे अवलोकन केले. मा.उच्च न्यायालय, मुंबई सर्किट बेंच, कोल्हापूर यांनी वादीस दुय्यम पुरावा करण्यास किंवा हमीपत्राचा शोध घेण्यास परवानगी दिली होती, परंतु वादीने निशाणी २२६ वर अर्ज दाखल करून फेर पुरावा करण्यास परवानगी मागितली. तो अर्ज मंजूर करून वादीस तशी परवानगी देण्यात आली. त्यानुसार वादीने दिनांक ०५-०१-२०२६ रोजी सतिश रेडेकर यांचे पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यांचा उलटतपास दिनांक १३-०१-२०२६ रोजी प्रतिवादी तर्फे घेण्यात आला. त्यानंतर वादीने सदर अर्ज दाखल केला आहे.

**९.** मा.उच्च न्यायालय, मुंबई सर्किट बेंच, कोल्हापूर यांनी दिनांक २८-११-२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार दुय्यम पुरावा करण्याकरीता वादीने कोणतीही कृती केली नाही. दिनांक ११-०२-१९८८ रोजीच्या हमीपत्राची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल आहे. ती छायांकित प्रत असल्याने विष्णू निलवे यांच्या साक्षी दरम्यान त्यास निशाणी देण्यात आली नव्हती. भारतीय पुरावा कायदा कलम ६७ नुसार सतिश रेडेकर यांनी हमीपत्राच्या छायांकित प्रतीमधील हस्ताक्षर व सही त्यांच्या वडीलांची आहे, असे जरी ओळखले असले तरी, तो दस्त मुळ प्रत नाही. त्यामुळे त्यांच्या साक्षीवरून देखील त्यास निशाणी देवून पुरावा वाचता येणार नाही. भारतीय पुरावा कायदा कलम ६७ हे मुळ कागदपत्राबाबत आहे, छायांकित प्रतीबाबत नाही.

**१०.** वादीने दाव्यात मुळ हमीपत्र प्रतिवादीच्या ताब्यात आहे, असे कथन केले नाही. तसेच ते हमीपत्र प्रतिवादीने दाखल करावे म्हणून प्रतिवादीस नोटीस देखील दिली नाही. छायांकित प्रत ही भारतीय पुरावा कायदा कलम ६३ नुसार दुय्यम पुरावा होत नाही. मा.उच्च

न्यायालय, मुंबई सर्किट बेंच, कोल्हापूर यांनी दिलेल्या आदेशानुसार हमीपत्राचा दुय्यम पुरावा करण्यासाठी वादीस दिलेल्या संधीचा उपयोग वादीने केल्याचे दिसून येत नाही. विष्णू निलवे किंवा सतिश रेडेकर यांच्या साक्षीवरून हमीपत्राची छायांकित प्रत निशाणी देवून पुरावा म्हणून वाचता येणार नाही. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.16 11:06:42 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २१/०२/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज